MHBU130027892025

| | | |
|---|---|---|
| **दाखल दिनांक** | **:** | **१४.११.२०२५** |
| **नोंदणी दिनांक** | **:** | **१४.११.२०२५** |
| **निकाल दिनांक** | **:** | **२०.०४.२०२६** |
| **कालावधी** | **:** | **५ महिने ६ दिवस** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली, यांचे न्यायालयात.**

**(पीठासीन अधिकारी : आय.ए.वाय.ए. खान)**

**नि.फौजदारी खटला क्र. १७३८/२०२५**

**निशाणी क्रमांक ८२**

महाराष्ट्र शासन,
तर्फे : पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, बुलडाणा शहर,
ता. व जि. बुलडाणा. ..... **अभियोगपक्ष**

**- विरुध्द -**

१. राहुल सिध्दीविनायक बोंद्रे,
वय ५० वर्ष, धंदा - शेती,
२. संजय भगवान राठोड,
वय ५२ वर्ष, धंदा - शेती,
३. लक्ष्मण जानुजी घुमरे,
वय ७० वर्ष, धंदा - शेती,
४. संतोष विनायकराव आंबेकर,
वय ६९ वर्ष, धंदा - व्यापार,
५. प्रकाश रामभाऊ अवचार,
वय ५०, धंदा - व्यापार,
६. संजय नामदेवराव पांढरे,
वय ६१, धंदा - शेती,
७. विनोद रमेश बेंडवाल,
वय ४८, धंदा - शेती,

८. शैलेश प्रभाकर खेडकर,
वय ३५ वर्ष, धंदा - मजुरी,

९. विजय बन्सी अंभोरे,
वय ६९ वर्ष, धंदा - सामाजिक कार्यकर्ता,

१०. शैलेश सुबोध सावजी,
वय ५२, धंदा - शेती,

११. सतीष जोसेफ मेहेंद्रे,
वय ६५, धंदा - सामाजिक कार्यकर्ता,
क्र. १ व ६ रा. चिखली,
क्र. २ ते ४, ७ ते ९ व ११ रा. बुलडाणा,
क्र. ५ पिंपळगांव काळे, जि. जळगांव जामोद,
क्र. १० रा. डोणगांव,
ता. मेहकर जि. बुलडाणा ..... **<u>आरोपी</u>**

**<u>गुन्हा</u>** :- कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम प्रमाणे.

---

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मो. बशीर
आरोपींतर्फे विधीज्ञ व्ही.एन. नन्हई

---

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(घोषीत दि. २०/०४/२०२६)**

आरोपींविरुध्द कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम नुसार खटला चालवित येत आहे.

२. **अभियोग पक्षाचे कथन –**

फिर्यादी उमेश भास्कर घुबे पो.कॉ. याने बुलढाणा शहर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दि. २१.०६.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजण्याचे दरम्यान तो पेट्रोलिंग करीत असताना जयस्तंभ चौक बुलडाणा येथे आरोपी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, महायुती सरकार विरुध्द आंदोलन करण्यासाठी एकत्रीत जमले होते. त्यावेळी बुलडाणा पोलिसस्टेशनला माहिती देऊन पो.हे.कॉ. सुनिल जाधव, पो.ना. इमरान खान, पो.कॉ. बाबुसिंग पट्टे यांना बंदोबस्ताकरीता बोलावण्यात आले होते. त्यावेळी जयस्तंभ चौकच्या एका बाजूला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते एकत्रीत उभे राहून हातामध्ये कॉंग्रेस पक्षाचे झेंडे घेऊन त्यासोबत महाराष्ट्र सरकारचा प्रतीकात्मक बुलगावने सारखा पुतळा व 'महाभ्रष्ट महायुती सरकारवर चिखलफेक आंदोलन' असा मजकुर लिहीलेला पोस्टर घेऊन 'महायुती सरकारचा निषेध असो, मोदी सरकार हाय हाय, तानाशाही नही सहेंगे, या सरकारचं करायचं काय खाली मुंडक वर पाय' अशा जोरजोरात घोषणा देत होते. तसेच प्रतिकात्मक पुतळ्यावर व पोस्टरवर चिखल फेक करुन सरकारचा प्रतीकात्मक पुतळा जाळण्यात आला होता. त्यावेळी मा. जिल्हाधिकारी साहेब बुलडाणा यांचे आदेश क्र. गृहविभाग कक्ष ४–२/कावी/२१२/२०२४ दि. १०.०६.२०२४ अन्वये दि. ११.०६.२०२४ च्या सकाळी ६.०० वाजतापासून ते दि. २५.०६.२०२४ च्या रात्री १२.००

पावेतो संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यामध्ये मुंबई पोलिस कायदा १९५१ चे कलम १३५ लागू होता. त्यानंतर फिर्यादीने बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद क्र. ५३६/२०२४ दाखल झाला. तपासिक अंमलदार पो.हे.कॉ. प्रकाश किसन बाजड यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपास टिपण नोंदवले. तपासाअंती आरोपींविरुद्ध वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींना सदर दोषारापातील मजकूर वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा दोषी ठेवण्याइतपत आल्याने फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्रमांक ७२ ते ८२-अ अन्वये नोंदविण्यात आले आहे.

६. माझ्या विचाराधीन उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन समान उद्दीष्ट साधण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचा भंग केला व त्यायोगे कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही**. |
| २. | आदेश काय ? | **आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

७. सरकारी अभियोक्ता मो.बशीर मो.नसीर व आरोपीतर्फे वकील श्री. व्ही.एन. नन्हई यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्रे तपासली.

८. अभियोग पक्षाने एकुण सात साक्षीदार तपासले त्यामध्ये सा. क्र. १ राजु श्रीराम चोपडे यास नि.क्र. ६१ वर, सा.क्र. २ सुनिल गुलाबराव जाधव यास नि.क्र. ६३ वर, सा.क्र. ३ उमेश भास्कर घुबे यास नि.क्र. ६४ वर, सा.क्र. ४

इमरानखान उमेदखान पठान यास नि.क्र. ६८ वर, सा.क्र. ५ प्रकाश किसन बाजड यास नि.क्र. ६९ वर तपासले.

९. अभियोग पक्षाने आरोपीवर कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम खालील गुन्हा सिध्द करणे गरजेचे आहे. त्या अनुषंघाने मी सदर कलम पुराव्याचे पुनरुच्चारण करणेकामी खालील प्रमाणे पुनरुच्चीत करीत आहे.

“Section 135 makes it an offense to disobey or fail to comply with orders, directions, or notifications issued by the State Government or a police officer under Section 37 of the Act.”

“The offense is considered cognizable if the conditions set by the law are met, allowing a police officer to arrest without a warrant and start prosecution. If these conditions are not met, it becomes a non-cognizable offense.”

"या कलमाचा वापर सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी लागू केलेले नियम आणि कायदे लागू करण्यासाठी केला जातो, जसे की वाहतूक, सभा किंवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर क्रियाकलापांवर निर्बंध."

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u>** :–

१०. अभियोगपक्षाच्या वतीने आरोपीवर कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम नुसार गुन्हा सिध्द करणेकामी एकुण ५ साक्षीदार तपासले. पंच सा.क्र. १ राजु श्रीराम चोपडे यास नि.क्र. ६१ वर तपासले. त्याने सरतपासात कथन केले की, तो फिर्यादीला ओळखत नाही. दि २१.०६.२०२४ रोजी पोलिसांनी त्याला पंचनामा करण्यासाठी जयस्तंभ चौक येथे बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची फक्त सही आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने त्याला उलट तपासाच्या स्वरुपाचे सुचक प्रश्न विचारले. परंतु सर्व सुचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तरे देवून फिर्यादमधील कथने नाकारली. सदर साक्षीदार फितुर झाल्यामुळे त्याच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही.

११. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र. २ सुनिल गुलाबराव जाधव यांस नि.क्र. ६३ वर तपासले. त्याने त्याच्या साक्षीत नमूद केले की, तो फिर्यादी उमेश घुबे यांना ओळखतो. तो दि. २१.०६.२०२४ रोजी बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होता. त्यादिवशी त्याला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते जयस्तंभ चौक बुलडाणा येथे जमलेले आहे अशी माहिती मिळाली. तो व त्याच्यासोबत इतर पोलिस जयस्तंभ चौक

येथे गेले असता आरोपी तेथे जमले होते व आंदोलन करीत होते. तसेच आरोपींनी महायुती सरकारबद्दल घोषणाबाजी केल्या व महायुती सरकारचा प्रतिकात्मक पुतळा जाळला. आरोपींच्या हातामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे झेंडे व बॅनर होते त्या बॅनरवर महायुती सरकारवर चिखली फेक आंदोलन असे लिहीलेले होते. आरोपींनी विना परवानगीने एकत्र जमून मा. जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

१२. उलटतपासात त्याने मान्य केले की, तो बुलडाणा शहर पो.स्टे. येथे २०२१ पासुन कार्यरत आहे. त्यामुळे त्याला बुलडाण्यातील सर्व ठिकाणची माहिती आहे. घटनास्थळावरुन त्याला कोणत्याही इसमाची तोंडी अथवा लेखी तक्रार आली नव्हती. त्याला सर्व आरोपींची नावे माहीत नाही. त्याने पुढे मान्य केले की, ज्या वेळी घटना घडली त्यावेळी राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार होते. जिल्हाधिकारी साहेबांच्या आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे त्याने पाहिले नाही.

१३. अभियोग पक्षाने फिर्यादी सा.क्र. ३ उमेश भास्कर घुबे यास नि.क्र. ६४ वर तपासले. सदर साक्षीदाराने सरतपासात कथन केले की, तो दि. २१.०६.२०२४ रोजी बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे गोपनिय विभागामध्ये पोलिस शिपाई म्हणून कार्यरत होता. सदर दिवशी दुपारी २.०० वाजता बुलडाणा शहरामध्ये पेट्रोलींग करताना जयस्तंभ चौक येथे कॉंग्रेसपक्षाचे काही कार्यकर्ते जमा झालेले त्याला

दिसले. त्यानंतर त्याने इतर पोलिस अधिका-यांना बोलावून घेतले. जयस्तंभ चौक येथे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे काही कार्यकर्ते हे हातामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे झेंडे व महाराष्ट्र सरकारचा प्रतिकात्मक पुतळा व 'महायुती महाभ्रष्ट सरकार' असे लिहीलेले बॅनर हातामध्ये घेऊन हजर होते. सदर आंदोलनामध्ये माजी आमदार राहुल बोंद्रे, संजय पांढरे, संजय राठोड, शैलेश सावजी, शैलेश खेडेकर, सतिष महेंद्रे, विजय आंभोरे, संतोष आंबेकर व इतर आठ ते दहा कार्यकर्ते हजर होते. सदरचे आंदोलन आरोपीतांनी दुपारी १४.०० ते १४.२० च्या दरम्यान केले. आंदोलनादरम्यान त्यांनी महाराष्ट्र सरकारचा प्रतिकात्मक पुतळा चिखलीफेक करुन जाळला व त्या दरम्यान त्यांनी 'तानाशाही नही सहेंगे, या सरकारचं करायचं काय खाली मुंडकं वर पाय' अशी घोषणाबाजी केली. आरोपींनी मा. जिल्हाधिकारी यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले. त्यानंतर त्याने घटनेची फिर्याद पोलिसस्टेशन बुलडाणा शहर येथे दिली. फिर्यादला नि.क्र. ६५ व छापील फिर्यादला नि.क्र. ६६ देण्यात आले.

१४. उलटतपासात त्याने मान्य केले की, तो बुलडाणा शहर पो.स्टे. येथे २०२१ पासुन कार्यरत आहे त्यामुळे त्याला बुलडाण्यातील सर्व ठिकाणची माहिती आहे. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. घटनास्थळावरुन त्याला कोणत्याही त्रयस्थ इसमाची तोंडी अथवा लेखी तक्रार आली नाही. तो सर्व आरोपीची नावे सांगू शकत नाही. त्याने उलटतपासात पूढे मान्य केले की, ज्या वेळी घटना घडली त्यावेळी राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार होते. जिल्हाधिकारी साहेबांची जमावबंदी आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे त्याने पाहिले नाही.

१५. सा.क्र. ४ इमरान उमेदखान पठान यास नि.क्र. ६८ वर तपासले. सदर साक्षीदाराने सुद्धा त्याचे सरतपासात साक्षीदार क्र. ३ च्या सरतपासाचे मजकुराप्रमाणे सारखे कथन केले. उलटतपासात सुध्दा त्याने सा.क्र. ३ सारखे वरील नमुद सर्व प्रश्नांचे उत्तरे होकारार्थी मध्ये दिली. त्यामुळे मी पुन्हा येथे पुनरोच्चीत करीत नाही.

१६. अभियोग पक्षाने सा.क्र. ५ प्रकाश किसन बाजड पोलिस हेड कॉस्टेबल तपासीक अधिकारी आहे. सदर गुन्हयाचा तपासकरणेकामी सदरचा तपास त्याला मिळाला. केस डायरीमध्ये त्याला फिर्यादीचा रिपोर्ट, एफआयआर व तोंडी रिपोर्ट इत्यादी कागदपत्रे मिळाली. त्याने दोन पंचांना घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ पंचनाम्याला नि.क्र. ७० देण्यात आले. त्याने घटनास्थळी हजर असणा-या साक्षीदाराचे जबाब नोंदविले. मा. जिल्हाधिकारी साहेबांच्या जमावबंदीच्या आदेशाची छायांकीतप्रत दोषारोपपत्रामध्ये समाविष्ठ केली. आरोपीतांविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. त्याच्या तपासामध्ये घटनेच्या वेळी आरोपीतांनी एकत्र जमून मा. जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले. तसेच महायुती सरकारच्या विरोधात चिखलफेक आंदोलन केले असे निर्दशनास आले.

१७. उलटतपासात त्याने मान्य केले की, तो बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे सन २०२४ पासून कार्यरत आहे. त्याला बुलडाणा शहराची व

तेथील सर्व चौकाची व रस्त्याची परिपूर्ण माहिती आहे. त्याने मान्य केले की, एफआयआर चार तास उशीराने दाखल झाला आहे. आरोपी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे आहेत. घटनेच्या वेळी राज्यात भाजपाचे सरकार होते. त्याने पुढे मान्य केले की, मा. जिल्हाधिकारी साहेबांच्या जमावबंदीच्या आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याची कुठलीही प्रत त्याने दोषारोपपत्रामध्ये दाखल केली नाही.

१८. वरील पुराव्याचे व कायद्याचे एकंदरीत अवलोकन करता असे दिसून येते की, आरोपींविरुध्द फिर्याद देण्यात आली की, दि. २१.०६.२०२४ रोजी आरोपींनी जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे जमा होवून महायुती सरकार विरूद्ध आंदोलन केले तसेच त्यांच्या हातामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे झेंडे होते. त्यांनी महाराष्ट्र सरकारचा प्रतीकात्मक बुलगावणे स्वरुपाचा पुतळा व 'महाभ्रष्ट महायुती सरकारवर चिखलफेक आंदोलन' असा मजकुर लिहीलेले पोस्टर घेऊन 'महायुती सरकारचा निषेध असो, मोदी सरकार हाय हाय, तानाशाही नही सहेंगे, या सरकारचं करायचं काय खाली मुंडकं वर पाय' अशा जोरजोरात घोषणा देत होते. तसेच प्रतिकात्मक पुतळयावर व पोस्टरवर चिखल फेक करुन सरकारचा प्रतीकात्मक पुतळा जाळण्यात आला होता. त्यावेळी 'बीजेपी सरकारचं करायचं काय खाली मुंडक वर पाय, बीजेपी सरकारचा निषेध असो, जब जब मोदी डरता

है ईडी को आगे करता है' अशा घोषणा करुन आंदोलने करीत होते. त्यावेळी मा. जिल्हाधिकारी साहेब बुलडाणा यांचे संपूर्ण बुलडाणा जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी यांचे आदेश व मुंबई पोलिस कायदा १९५१ चे कलम १३५ लागू होता.

१९. त्यावेळी मा. जिल्हाधिकारी साहेब बुलडाणा यांचे आदेश क्र. गृहविभाग कक्ष ४–२/कावी/२१२/२०२४ दि. १०.०६.२०२४ अन्वये दि. ११.०६.२०२४ च्या सकाळी ६.०० वाजतापासून ते दि. २५.०६.२०२४ च्या रात्री १२.०० पावेतो संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यामध्ये मुंबई पोलिस कायदा १९५१ चे कलम १३५ लागू होता. परंतु, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी उलटतपासात मान्य केले की, सदरचे आदेश जाहिरातीमध्ये कोठेही बघितले नव्हते. अभिलेखामधील व पुराव्यात सुद्धा सदर आदेशाला किंवा त्याच्या प्रतला सिद्ध करण्यात आले नाही. सबब, सदर आदेश घटनेच्या वेळी अस्तित्वात होता याबाबत शंका निर्माण करतो. गुन्ह्याबाबत कोणत्याही इसमाने पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली नाही. जयस्तंभ चौक बुलडाणा येथील राहणारे इसम किंवा दुकानदारांना तपासण्यात आले नाही. सबब, कोणतेही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आले नाही. तसेच सदर ठिकाणी किंवा कोणतेही इतर ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज किंवा मोबाईल मधील चित्रीकरण पुरावा म्हणून सिद्ध करण्यात आले नाही.

२०. आरोपीच्या हातात राष्ट्रीय कांग्रेस पक्षाचे झेंडे होते असे फिर्यादमध्ये नमूद करण्यात आले. परंतु, सदरचे कोणतेही झेंडे जप्त करण्यात आले नाही. महाराष्ट्र सरकारचा प्रतीकात्मक बुलगावणे स्वरुपाचा पुतळा व 'महाभ्रष्ट महायुती सरकारवर चिखलफेक आंदोलन' असा मजकुर लिहीलेले पोस्टर जाळण्यात आले. परंतु सदर पोस्टरचे जाळलेले अवशेष अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही. तसेच सिद्ध करण्यात आले नाही. अभियोग पक्षाने स्वतंत्र असा साक्षीदार तपासलेला नाही. घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.१ राजू चोपडे याने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. पोलीसांनी त्याच्या समक्ष पंचनामा केला नाही. असे सरतपासात कथन केले त्यामुळे अभियोग पक्षाच्या कहाणीवर शंका निर्माण होते. सा.क्र. २ ते ५ यांनी सर्व आरोपींची नावे सरतपासात सांगू शकले नाही. फिर्याद चार तासांनी उशीरा दाखल करण्यात आली. याव्यतिरीक्त तपासिक अंमलदाराने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. दोषारोपमधील साक्षीदार क्र. २ ते ४ चे जबाब एक सारखे व समान असलेले मजकूर लिहून त्यांचा जबाब कलम १६१ सी.आर.पी.सी. नुसार तयार केला. प्रस्तुत प्रकरणामध्ये कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अधिनियम १९५१ अन्वये दोषारोप आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे सर्व आरोपी निर्दोष म्हणून मुक्त करण्यास पात्र आहेत. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर मी **नकारार्थी** देत आहे. सबब, मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी क्र.१ राहुल सिध्दीविनायक बोंद्रे, आरोपी क्र. २. संजय भगवान राठोड, आरोपी क्र.३ लक्ष्मण जानुजी घुमरे, आरोपी क्र. ४ संतोष विनायकराव आंबेकर, आरोपी क्र. ५ प्रकाश रामभाऊ अवचार, आरोपी क्र.६ संजय नामदेवराव पांढरे, आरोपी क्र. ७ विनोद रमेश बेंडवाल, आरोपी क्र .८ शैलेश प्रभाकर खेडकर, आरोपी क्र. ९ विजय बन्सी अंभोरे, आरोपी क्र. १० शैलेश सुबोध सावजी, आरोपी क्र.११ सतीष जोसेफ मेहेंद्रे यांना महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यांत येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपींनी कलम ३७६ भारतिय न्याय संहिता प्रमाणे रु. ६,०००/– ची जमानत द्यावी.

**(न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2026.04.20 18:22:24 +0530

**(आय.ए.वाय.ए. खान)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चिखली.

ठिकाणः चिखली
दिनांकः- २०/०४/२०२६

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.V. Nimje<br>Stenographer Grade III |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Chikhli. |
| Date | : | 20/04/2026 |
| Signed by P. O. on | : | 20/04/2026 |
| Uploaded on | : | 20/04/2026 |